**वाशिम जिल्हा पोलीस गॅझेट**
**अंक ३२ वा**
**दिनांक ०४/०८/२०२० ते दिनांक ०७/०८/२०२०**
**पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम.**
**जावक क्रमांक :- 4681 दिनांक :-** 2 SEP 2020

---

**भाग- १ :-**

**बदली :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आस्था/प्र.क्र.-८१/आंजिब-हजर/४१६९/२०२०, वाशिम, दिनांक :- ०५/०८/२०२० अन्वये आंतरजिल्हा बदलीवरुन कर्तव्यावर हजर करुन घेण्याबाबत पोशि/६९९०, सतिष गुलाबराव खडसे व पोशि/७०४५, विनोद किसन राठोड हयांची पोलीस आयुक्त, नागपुर शहर यांचे आस्थापनेवरुन पोलीस अधिक्षक वाशिम यांचे आस्थापनेवर विनंतीनुसार पोलीस शिपाई पदावर आंतरजिल्हा बदली झाल्याने ते हजर होणे कामी आले असता त्यांना खालील प्रमाणे त्यांचे नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे हजर करुन त्यांना या जिल्हयाचा बक्कल नंबर देऊन नेमणुक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.कर्म.यांचे नांव | जिल्हयातील देण्यात आलेला बं.नं. | हजर दिनांक | देण्यात आलेली नेमणुक |
|---|---|---|---|---|
| १. | पोशि/६९९०, सतिष गुलाबराव खडसे | ७८ | दि. ०१/०८/२०२० चे मा. पुर्व | पोलीस मुख्यालय |
| २. | पोशि/७०४५, विनोद किसन राठोड | ८२ | दि. ०१/०८/२०२० चे मा. पुर्व | पोलीस मुख्यालय |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/पोशि-४३३, बालाजी बर्वे/बदली/४१६५/२०२० वाशिम दिनांक :- ०५/०८/२०२० अन्वये पोशि/४३३, बालाजी भिकाजी बर्वे, नेमणुक पोस्टे मानोरा येथे नेमणुकीस असतांना यांचेविरुध्द प्राप्त झालेल्या कसुरी अहवालावरुन त्यांची पोस्टे मानोरा येथुन पो.स्टे. वाशिम शहर येथे त्वरीत प्रभावाने बदली करण्यांत येतआहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/पोशि-७४९, योगेश इंगळे/बदली/४१६६/२०२० वाशिम दिनांक :- ०५/०८/२०२० अन्वये पोशि/७४९, योगेश इंगळे, नेमणुक पोस्टे कारंजा ग्रामीण येथे नेमणुकीस असतांना यांचेविरुध्द प्राप्त झालेल्या कसुरी अहवालावरुन त्यांची कारंजा ग्रामीण येथुन पो.स्टे. वाशिम ग्रामीण येथे त्वरीत प्रभावाने बदली करण्यांत येतआहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आस्था/प्र.क.-८१/आंजिब-हजर/४२१६/२०२०, वाशिम दिनांक :- ०७/०८/२०२० अन्वये आंतरजिल्हा बदलीवरुन कर्तव्यावर हजर करुन घेण्याबाबत पोशि/३८७, सईद रेघीवाले हयांची पोलीस अधिक्षक, चंद्रपुर यांचे आस्थापनेवरुन पोलीस अधिक्षक वाशिम यांचे आस्थापनेवर विनंतीनुसार पोलीस शिपाई पदावर आंतरजिल्हा बदली झाल्यांने ते हजर होणे कामी आले असता त्यांना खालील प्रमाणे त्यांचे नावांसमोर दर्शविल्याप्रमाणे हजर करुन त्यांना या जिल्हयाचा बक्कल नंबर देऊन नेमणुक करण्यात आली आहे.

| अ.क्र. | पो. कर्म. यांचे नांव | जिल्हयातील देण्यात आलेला बं.नं. | हजर दिनांक | देण्यात आलेली नेमणुक |
|---|---|---|---|---|
| १. | पोशि/३८७, सईद रेघीवाले | १११ | दि. ०५/०८/२०२० चे मा. पुर्व | पोलीस मुख्यालय, वाशिम. |

**पदोन्नती :- निरंक**

**नेमणुक :- निरंक**

**भाग-२ :-**

**रजा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि.-०२/अर्जित रजा/पो.कर्मचारी/४१७०/२०२, वाशिम दिनांक :- ०५/०८/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांची यांनी वाढीव अर्जित रजा मिळणे बाबतची विनंती केल्याने त्यांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या कारणास्तव रजेवर सोडल्याचे वाढीव अर्जित रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | कर्मचारी यांचे नाव, पदनाम व ब.नं. | नेमणुक | रजेचे कारण | मंजुर रजा |
|---|---|---|---|---|
| १. | पोशि/३०२, जावेद बेनीवाले | आसेगांव | स्वताचे लग्नाकरीता | १५ दिवस |
| २. | मपोशि/९८५, मोहिनी वर्धे | वाशिम शहर | गर्भवती असल्याकारणाने | १५ दिवस |

**परवानगी :- निरंक**

**भाग -३ :-**

**बढती :- निरंक**

**पगार:-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि-२/सुधारित वे.नि./पोहवा-४२/नेहारे/४१३३/२०२०, वाशिम दिनांक :- ०४/०८/२०२० अन्वये पोहवा/४२, महेश गणबाजी नेहारे नेमणुक म.सु.प. अमनी यांचे या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७/(१)/पोहवा-४२/महेश नेहारे/२०१९/१८१६० दिनांक २५/१०/२०१९ अन्वये त्याचा दिनांक २८/०१/२०१३ ते दिनांक ०५/०२/२०१४ पर्यतचा निलंबन कालावधी हा सर्व प्रयोजनार्थ कर्तव्यकाळ म्हणुन गणण्यात आल्याने त्यांची त्यांचे विनंतीनुसार सुधारित रित्याने सदर वेतननिश्चिती या आदेशाव्दारे मंजुर करण्यात आली आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि-२/वार्षिक वेतनवाढ/पोशि-सुडके/४१३२/२०२०, वाशिम दिनांक :- ०४/०८/२०२० अन्वये पोशि/३२२, रुपेश सुभाष सुडके नेमणुक पो.स्टे. वाशिम ग्रामीण यांना दिनांक ०१/०७/२०२० रोजीची वार्षिक वेतनवाढ खालील प्रमाणे स्तंभ "अ " नुसार देण्यात आली होती. परंतु नमुद पोशि/३२२, रुपेश सुडके यांना या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/विचौ/पी-६७(१)/पोउपनि मच्छले+६/ अंतीम आदेश/३००७/२०२० दिनांक १६/०६/२०२० अन्वये पुढील देय वेतनवाढ ०१ वर्षाकरीता रोखण्याची शिक्षा असलयाने नमुद पोलीस कर्मचारी यांना दिनांक ०१/०७/२०२० रोजीची वार्षिक वेतनवाढ देय होणार नाही. करीता नमुद पोशि/३२२, रुपेश सुभाष सुडके योना यांना या आदेशाव्दारे खालील प्रमाणे स्तंभ "अ " नुसार देण्यात आलेल्या वेतनवाढ ऐवजी स्तंभ "ब" नुसार वार्षिक वेतनवाढ मंजुर करण्यात येत आहे.

| स्तंभ - अ | | | स्तंभ -ब | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | वेतन स्तर | मुळ वेतन | दिनांक | वेतनस्तर | मुळ वेतन |
| ०१/०७/२०२० | S-७ | २७६०० | ०१/०७/२०२० | S-७ | २६८०० |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आधि.आस्था/सपोनि.जाधवर/शिक्षेतुन पुन:स्थापीत/२०२०/४१५३ वाशिम दिनांक :- ०५/०८/२०२० अन्वये सहायक पोलीस निरीक्षक, बाळु संपत्ती जाधवर, प्रभारी अधिकारी पोस्टे. जऊळका यांना कार्यालयीन आदेश क्रमांक पोअवा/विचौ शाखा/विचौ/सपोनि-जाधवर/अंतीम आदेश/११०११/२०१९ दिनांक ०९/०७/२०१९ अन्वये त्यांनी केलेल्या कसुरीकरिता त्यांना देय वार्षिक वेतनवाढ एक वर्षाकरिता ( पुढील वेतनवाढीवर परिणाम न होणारी) रोखण्याची शिक्षा देण्यात आली होती. दिनांक ०१/०७/२०१९ पासुन सदर शिक्षेची अमंलबजावणी करण्यात आली असुन दिनांक ३०/०६/२०२० रोजी शिक्षेचा कालावधी संपुष्ठात आलेला आहे. तरी त्यांना खालील प्रमाणे स्तंभ " अ " मध्ये त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे वेतन अदा करण्यात आले असुन तरी त्यांची स्तंभ " ब " मध्ये दर्शविल्याप्रमाणे सदर वेतनवाढ रोखण्याचे शिक्षेतुन पुन:स्थापीत करण्यात येवुन त्यांना **सहायक पोलीस निरीक्षक वेतन सरंचना एस-१५ रु. ४१८००- १३२३००/-** मध्ये पुढील वेतनवाढ मंजुर करण्यांत येत आहे.

| **स्तंभ " अ " विद्यमान वेतन** | | **स्तंभ " ब " सुधारित वेतन** | | | |
|---|---|---|---|---|---|
| **वेतनस्तर** | **वेतन** | **वेतनस्तर** | **वेतन** | **दिनांक** | **शेरा** |
| एस-१५ | ५१५०० | एस -१५ | ५१५०० | ०१/०७/२०१८ | नियमित वार्षिक वेतनवाढ |
| एस-१५ | ५१५०० | एस-१५ | ५३००० | ०१/०७/२०१९ | **काल्पनिक वेतनवाढ ( एक वर्ष वेतनवाढ स्थगितीची शिक्षाअसल्याने)** |
| एस- १५ | ५१५०० | एस-१५ | ५४६०० | ०१/०७/२०२० | नियमीत वार्षिक वेतवाढ ( शिक्षेतुन पुन:स्थापीत झाल्याने ) |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक :पोअवा/आलि-२ व ३ /वार्षिक वेतनवाढ-२०२०/पोलीस कर्मचारी/PC TO ASI/४२०२/२०२०, वशिम दिनांक :- ०७/०८/२०२० अन्वये खालील नमुद पोलीस कर्मचारी यांनी त्यांचे संगणक अर्हता (MS-CIT) प्रमाणपत्र या कार्यालयास सादर केल्याने महाराष्ट्र नागरी सेवा ( सुधारित वेतन ) नियम,२०१९ अन्वये महाराष्ट्र शासन वित्त विभाग, अधिसुचना दिनांक ३० जानेवारी २०१९ मधील नियम क्रमांक १० नुसार तसेच महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : वेतन -११२०/प्र.क्र.२६/२०२०/सेवा-३ दिनांक ०२/ जुलै २०२० अन्वये त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या प्रमाणे दिनांक ०१/०१/२०२० व दिनांक ०१/७/२०२० रोजीची वार्षिक वेतनवाढ मंजुर करण्यात येत आहे.

**वेतनश्रेणी :-**

१) पोलीस हवालदार (HC) :- सुधरित वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर :- S-०९:२६४०००-८३६००/-विशेष वेतन रुपये ७५०/-

२) पोलीस नाईक (NPC) :- सुधरित वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर :- S-०८:२५५००-८११००/-

३) पोलीस शिपाई (PC) :- सुधरित वेतन मॅट्रीक्स मधील वेतनस्तर :- S-०७:२१७००-६९१००/-/-विशेष वेतन रुपये ७५०/-

सदरची वेतनवाढ ही पोलीस अधिक्षक वाशिम यांचे संकेतस्थळावर सर्वाकरीता उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

**भाग -४ :-**

**बक्षिस:- निरंक**

**भाग -५ :-**

**शिक्षा :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौशाखा/पी-६७(१)/पोशि-११७९, नईम शेख व मपोशि-१३७, प्रियंका/४१६७/२०२०, वाशिम दिनांक :- ०५/०८/२०२० अन्वये मपोशि/१३७, प्रियंका लाटे व पोशि/११७९, नईम शेख, नेमणुक शहर वाहतुक शाखा, वाशिम येथे नेमणुकीस असतांना दिनांक ३१/०७/२०२० रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे डयुटी असतांना आपणास आम्ही स्वत: पाईंट चेक केले असता आपण सदर पॉईटवर गैरहजर मिळुन आलात. अशाप्रकारे आपली अति महत्वाची डयुटी लावण्यांत आली असतांना सुध्दा आपण वरिष्ठांना कोणत्याही प्रकारची पुर्व सुचना न देता पॉईटवरुन गैरहजर राहीलयाने आपणास मुंबई पोलीस शिक्षा व अपील नियम १९५६ मधील क्रमांक (३) (२) (२) नुसार सक्त ताकीद ही शिक्षा देण्यांत येत आहे.

**निलंबन :- निरंक**

**भाग -६ :-**

**प्रशिक्षण व इतर :-**

**प्रशिक्षण:- निरंक**

**इतर. :-**

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/पशा-५/लिपीक व वर्ग -४ स्थायीत्व प्रमाणपत्र/२०२०/४१३४ वाशिम दिनांक ०४/०८/२०२० अन्वये प्रमाणीत करण्यात येते की, शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, स्थाप्रप-१४१४(प्र.क.७३)१३ अ दिनांक ११/०९/२०१४ मधील सुचना क्र.१ येथे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व शर्ती खाली नमुद करण्यात आलेल्या अस्थायी शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतीत पुर्ण झालेल्या आहेत आणि त्यानुसार ते कर्मचारी आवश्यक त्या सर्व प्रयोजनार्थ त्यांच्या नावासमोर स्तंभ-३ मध्ये नमुद केलेल्य पदावर स्तंभ -५ मध्ये नमुद केलेल्या दिनांकापासुन स्थायी शासकीय कर्मचारी म्हणुन समजले जाण्यास पात्र आहे.

| अ.क्र. | शासकीय कर्मचाऱ्यांचे नाव व सध्याचे पदनाम | ज्या पदावर रकाना क्र.२ मधील कर्मचाऱ्यास स्थायीत्व प्रमाणपत्र देण्यात येते त्या पदाचे नाम | पदावरील नियुक्तीचा दिनांक | कोणत्या दिनांकापासुन स्थायीत्व प्रमाणपत्र देण्यात आले. |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | पंडित यशवंत गवई, वरिष्ठ श्रेणी लिपीक | कनिष्ठ श्रेणी लिपीक | २९/०१/२००१ | २९/०१/२००४ |
| २ | राजेश बलराम ठाकरे, वरिष्ठ श्रेणी लिपीक | कनिष्ठ श्रेणी लिपीक | २१/०१/२००४ | २१/०१/२००७ |
| ३ | प्रविण प्रल्हादराव हरिमकर, कनिष्ठ श्रेणी लिपीक | वर्ग - ४ | ०१/०४/२००४ | ०१/०४/२००७ |
| ४ | संतोष संजय मापारी, कनिष्ठ श्रेणी लिपीक | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ३०/०८/२०१४ | ३०/०८/२०१७ |
| ५ | निलेश सुरेश बोबडे कनिष्ठ श्रेणी लिपीक | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ३०/०८/२००४ | ३०/०८/२०१७ |
| ६ | जगन मारोत शिंदे कनिष्ठ श्रेणी लिपीक | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ३०/०८/२०१४ | ३०/०८/२००१७ |
| ७ | शहीफ सिददीकी, कनिष्ठ श्रेणी लिपीक | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ०४/०९/२०१४ | ०४/०९/२०१७ |
| ८ | अमोल प्रभाकर खाडे, कनिष्ठ श्रेणी लिपीक | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ०६/०१/२०१४ | ०६/०१/२०१७ |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/विचौ/पी-६७(१)/सपोउपनि-४७४, गोवर्धन/नस्तीबध्द/४१५१/२०२० वाशिम दिनांक :- ०५/०८/२०२० अन्वये राखीव पोलीस निरीक्षक पोलीस मुख्यालय, वाशिम यांचे पत्र क्रमांक १६१७/२०२०, दिनांक १२/०९/२०१९ अन्वये सपोउपनि/४७४, गोवर्धन कोकाटे, नेमणुक पोलीस मुख्यालय, वाशिम हे कोत प्रमुख म्हणुन व दिनांक ११/०९/२०१९ चे २०.०० ते ०८.०० वाजता स्टेशन डायरी अमलंदार म्हणुन डयुटी असतांना सपोनि सागर दानडे, सपोनि विनोद घुईकर व सपोनि व्हि.म.खरसान मॅडम यांनी गणपती बंदोबस्त विधान सभा निवडणुक बंदोबस्त व दैनदिन कामकाजाकरिता पिस्टल मिळणेबाबत चा अर्ज सादर केला होता. सदर विनंती अर्जावर **मा. होम डीवायएसपी वाशिम यांचा वेपन दयावे** असा शेरा असलेला त्यांना दिला असता त्यांना कोत मधील पिस्टल व प्रत्येक १० राऊंड देत असतांना सपोनि सागर दानडे यांचे पिस्टल कॉक झाल्याने ती पिस्टल व्यवस्थित करुन देणेकरिता सपोनि दानडे यांनी सपोनि/४७४, गोवर्धन कोकाटे यांना दिले असता सपोउपनि/४७४, गोवर्धन कोकाटे हे सदरचे पिस्टल व्यवस्थित करित असतांना अचानक पिस्टल मधुन ०१ राऊंड फायर हावुन कोत मधील टेबल जवळील भिंतीवर लागली. परंतु सदर घटनेत कोणासही काहीही इजा दुखापत झाली नाही अशाप्रकारे अहवाल प्राप्त झालेला होता. सदर अहवालाचे अनुषंगाने सदर घटनेत कोणत्याही प्रकारे इजा /दुखापत न झाल्याने तसेच सदर कर्मचारी हे नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्याने सदरचे प्रकरण या आदेशाव्दारे " **नस्तीबध्द** " करण्यांत येत आहे.

या कार्यालयाचे आदेश क्रमांक : पोअवा/आलि-२/से.नि./पो.कर्म/४१६२/२०२० वाशिम दिनांक :- ०५/०८/२०२० अन्वये सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची माहिती मिळणेबाबत खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या दिनांकास सेवानिवृत्त झाले आहेत.

| अ.क्र. | सेवानिवृत्त होणारे कर्मचाऱ्यांचे नांव पदनाम/ब.नं. | नेमणुकीचा ठिकाण | सेवानिवृत्तीचा दिनांक |
|---|---|---|---|
| १. | पोहवा/६१३, विलास नारायण तायडे | वाशिम शहर | ३१/०७/२०२० |
| २. | पोहवा/६२२, काशिराम नरसिंग पवार | मंगरुळपिर | ३१/०७/२०२० |
| ३. | सपोउपनि/४५३, सुनिल हिरालाल कुंडलवाल | कारंजा ग्रामीण | ३१/०७/२०२० |
| ४. | सपोउपनि/९३२, रामेश्वर रामकृष्ण कोल्हे | जऊळका | ३१/०७/२०२० |

या कार्यालयाचे आदेश क्रमांक पोअवा/पशा-१/ लिपीक कर्मचारी/मराठी-हिंदी भाषा/सुट/४२०४/२०२०, वाशिम दिनांक :- ०७/०८/२०२० अन्वये खालील नमुद वरिष्ठ श्रेणी लिपीक व कनिष्ठ श्रेणी लिपीक हे माध्यमिक शालांत परिक्षा किंवा माध्यमिक शालांत परिक्षेचा उच्च परिक्षे मध्ये मराठी व हिंदी विषयात उतीर्ण असल्याने नमुद लिपीक कर्मचारी यांना महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक मभाप -१०८७/१४/सीआर-२/८७/२० दिनांक ३० डिसेंबर १९८७ मधील नियम ४ (१) मधील मुद्दा (४) व महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रमांक हिमाप-१०८३/१४४८/वीस, दिनांक १ डिसेंबर १९८४ मधील तरतुदींनुसार एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परिक्षा उत्तीर्ण होण्यापासुन पुर्वलक्षी प्रभावाने सुट देण्यात येत आहे.

| अ.क्र. | लिपीक कर्मचरी यांचे नाव व पदनाम | नेमणुक |
|---|---|---|
| १. | वश्रेलि., सरला आत्माराम हिवरकर | आकस्मीक लिपीक |
| २. | वश्रेलि., मिना राजपुत | आवक लिपीक |
| ३. | वश्रेलि., अभय देशमुख | --- |
| ४. | कश्रेलि., संध्या इंगोले | भ. नि. नि. लिपीक |
| ५. | कश्रेलि., संतोषकुमार शुक्ला | जावक लिपीक |
| ६. | कश्रेलि., नारायण गंगावणे | प्रवासभत्ता लिपीक |
| ७. | कश्रेलि., प्रविण हरीमकर | विचौ लिपीक |
| ८. | कश्रेलि., संतोष मापारी | आस्थापना लिपीक -२ |
| ९. | कश्रेलि., निलेश बोबडे | आस्थापना लिपीक - ३ |
| १०. | कश्रेलि., जगन शिंदे | मो.प.लिपीक |
| ११. | कश्रेलि., शहिफ सिध्दीकी | प्रबंधक |
| १२. | कश्रेलि., अमोल खाडे | पेन्शन लिपीक |

| | | |
|---|---|---|
| १३. | कश्रेलि., सचिन काळे | वेतन लिपीक |
| १४. | कश्रेलि., सिमा मैंद | आस्था सहायक |
| १५. | कश्रेलि., रंजीता चव्हाण | आस्था सहायक |
| १६. | कश्रेलि., सोनल डवले | आस्थापना लिपीक-४ |
| १७. | कश्रेलि., वर्षा गायकवाड | कल्याण लिपीक |
| १८. | कश्रेलि., छत्रपती मांहुरे | विचौ लिपीक सहायक |

**( वसंत परदेशी )**
**भा.पो.से.**
पोलीस अधिक्षक वाशिम.

प्रति,

संगणक कक्ष प्रमुख पोलीस अधिक्षक कार्यालय वाशिम यांना माहितीस व आवश्यक त्या कार्यवाहीस संगणक विभाग नेटवर प्रसिध्दी करणेबाबत /पत्रव्यहार शाखा लिपीक-१/डिपीजी लिपीक पो.अ.कार्यालय वाशिम.

२/- संगणक कक्ष प्रमुख यांनी सदरचे जिल्हा पोलीस गॅझेट अंक ३२ हे पोलीस अधिक्षक वाशिम यांचे "संकेतस्थळावर" सर्वांकरीता उपलब्ध करुन देण्याात यावे. तसेच सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी/सर्व ठाणेदार/सर्व शाखा प्रमुख जिल्हा वाशिम यांचे संकेतस्थळावर "ई-मेल द्वारे" सर्व संबंधितांना माहितीस व योग्य कार्यवाहीस.

-----ooooo-----